# कॉक्सिटच्या तब्बल 5 संघाची राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी निवड




लातूर : नुकतीच स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठस्तीय अविष्कार संशोधन (रिसर्च कन्वेन्शन) स्पर्धा दयानंद कला महाविद्यालय येथे पार पडली, त्यातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या संघांमध्ये सर्वाधिक 5 संघ हे कॉक्सिटचे असून पोस्ट पी.जी. गटातून प्रा. दिपाली महामुणी, प्रा. ज्योती कावळे, प्रा. कोमल गोमारे, महोम्मद मुजाहीद, तर पदव्युत्तर गटातून श्वेता मदने व वेदा बारसोले आणि पदवी गटातून आयेशा काझी व प्रियंका ढवळे यांच्या प्रोजेक्टस् ची निवड झालेली आहे.

याअगोदर लातूर जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये एकुण 108 संघांनी सहभाग नोंदविला, त्यामध्ये कॉक्सिटच्या 18 संघांचा समावेश होता. या स्पर्धेतून एकुण 29 संघांची निवड विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेसाठी करण्यात आली त्यापैकी सर्वाधीक 10 संघ हे कॉक्सिटचेच होते.

राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेसाठी निवड झालेल्या संघाचे रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. बी. एल. गायकवाड, डॉ. एन. व्ही. मोरे, प्रा. आय. एम. काझी, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**प्राचार्य**